नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १५८ Issue - 158 | वार - मंगळवार दि. ३ नोव्हेंबर २०२६ Blow- Tuesday Date 3 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

राज्यातील सात सत्र न्यायालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी

ठाणे, सांगली, परभणी, बीड, सोलापुरात न्यायालय परिसर केला रिकामा; न्यायालयाला ईमेलद्वारे धमकी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : आठवड्याच्या पहिल्याच दिवशी राज्यातील न्याय व्यवस्थेला हादरवून टाकणारी बातमी समोर आली आहे. सात सत्र न्यायालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे. सातारा, सोलापूर, ठाणे, बीड, रत्नागिरी, परभणी आणि हिंगोली न्यायालयांना त्यांच्या अकाऊंटवर ईमेलद्वारे धमकी आली आहे. ही गोष्ट लक्षात येताच पोलीस, डॉग आणि बॉम्ब शोधक-नाशक पथकांना पाचारण करण्यात आलं आहे. न्यायाधीश, वकील आणि पक्षकारांना बाहेर काढून इमारती मोकळ्या करण्यात आल्या असून इमारतींमध्ये तपासणी सुरू आहे.

सोमवारी सकाळी पहिल्यांदा सातारा जिल्हा व सत्र न्यायालयाला धमकीचा ईमेल आला. न्यायालयाची इमारत बॉम्बने उडवून देऊ, असे ईमेलमध्ये म्हटले होते. त्यामुळे न्यायालयीन अधीक्षकांनी त्वरित सातारा शहर पोलिसांनी माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलीस अधिकारी तातडीने न्यायालय परिसरात दाखल झाले. तसेच डॉग स्कोर आणि बीडीएस पथक देखील न्यायालयात पोहोचले. सर्व न्यायाधीश, वकील आणि पक्षकारांना बाहेर काढून न्यायालयाची इमारत मोकळी करण्यात आली. न्यायालयाची इमारत बॉमने उडवून देण्याची धमकी आल्यामुळे साताऱ्यात एकच खळबळ उडाली आहे.



साताऱ्यानंतर ठाणे, रत्नागिरी, परभणी, सोलापूर, बीड आणि हिंगोली सत्र न्यायालयांना देखील अशाच पद्धतीने ईमेल द्वारे धमकी देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील न्यायालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. धमकी आलेल्या न्यायालयांच्या परिसरात सध्या मोठ्या प्रमाणात पोलीस फौज फाटा दाखल झाला असून कसून तपासणी सुरू करण्यात आले आहे.

सातारा न्यायालय परिसरात पोलीस फौजफाटा दाखल झाल्यामुळे शहरात खळबळ उडाली. मोठा फौजफाटा पाहून नेमके काय झाले आहे, हे जाणून घेण्यासाठी नागरिकांची न्यायालयाच्या समोरील रस्त्यावर मोठी गर्दी झाली होती. ही बातमी वाऱ्यासारखी सातारा शहरात पसरली. दरम्यान, श्वान पथकासह बॉम्ब शोधक-नाशक पथकाकडून सातारा न्यायालयाच्या इमारतीची कसून तपासणी सुरू आहे.

रस्त्याचे काम सुरु असतानाच आठ कामगारांचा विजेचा धक्का लागून मृत्यू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



जयपूर : राजस्थानम धील झुंझुनू जिल्ह्यातील छपोली गावात रस्त्याचे काम सुरु असतानाच आठ कामगारांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. या अपघातात इतर पाच जण जखमी झाले. हा अपघात सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडला. उदयपूरवतीचे एसए-चओ रामपाल म्हणाले, रस्त्यावर काम करणाऱ्या एका ग्रॅव्हेल मिक्सर मशीनचा हायड्रॉलिक जॅक डोक्यावरील उच्च-दाब तारेला लागला. यामुळे म शीनमधून विद्युत प्रवाह वाहिला आणि कामगारांना विजेचा धक्का बसला.

अपघातानंतर गावकऱ्यांनी आंदोलन सुरू केले

११ केव्हीची ही लाईन मूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु अलीकडेच ती बदलण्यात आली. अपघातानंतर गावकरी आंदोलन करत आहेत. गावकरी रोहिताश्व म्हणाले, ११ केव्हीची लाईन म ूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु काही दिवसांपूर्वी ती रस्त्याच्या वरून हलवण्यात आली. सखल तारेमुळे हा मोठा अपघात घडला.

गावकरी अविनाश म्हणाले, हे काम वारंवार थांबवण्यात आले आहे. काम कोणतेही असो, सरकारला या गावात काही देणंघेणं नाही. गावकऱ्यांनी या कामासाठी पैसे गोळा केले होते. तरीही, सरकारी अधिकाऱ्यांनी आणि राजकारण्यांनी दोनदा काम थांबवले. खूप पाठपुरावा केल्यानंतरच काम पुन्हा सुरू करण्यात आले. प्राथमिक अहवालानुसार, पाच कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर तिघे गंभीररित्या भाजले. तथापि, पोलिसांनी नंतर मृतांची संख्या आठ असल्याचे सांगितले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय पथके घटनास्थळी दाखल झाली. मोठ्या संख्येने ग्राम स्थही घटनास्थळी जमले होते. स्थानिक लोकांच्या मदतीने मदत आणि बचाव कार्य करण्यात आले. अपघातानंतर, बांधकाम स्थळावरील सुरक्षेच्या व्यवस्थेबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मुख्यमंत्री शर्मा आणि माजी मुख्यमंत्र्यांनी शोक व्यक्त केला मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी अपघातावर शोक व्यक्त केला. एका एक्स-पोस्टमध्ये शर्मा यांनी लिहिले, झुंझुनू अपघातात विजेचा धक्का लागून कामगारांच्या अकाली मृत्यूची बातमी दुःखद आहे. संबंधित अधिकाऱ्यांना जखमींवर योग्य उपचार आणि पीडित कुटुंबांना तत्काळ सर्वतोपरी मदत करण्याचे, तसेच या घटनेची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आम्ही परमेश्वराकडे प्रार्थना करतो की, दिवंगत आत्म्यांना त्याच्या चरणी स्थान मिळो, जखमींना लवकरात लवकर बरे वाटो आणि शोकाकुल कुटुंबांना हे अथांग दुःख सहन करण्याची शक्ती मिळो. ओम शांती!राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले आहे.

विक्रमी पाऊस; बारामतीत तीन तासात १५८ मिलिमीटर पावसाची नोंद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बारामती : राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असताना पुणे जिल्ह्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. पुणे शहरासह बारामती, इंदापूर आणि जिल्ह्यातील काही भागांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांना या पावसामुळे दिलासा मिळाला असला, तरी अचानक आलेल्या पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. विशेषतः बारामतीमध्ये अवघ्या काही तासांत विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. एका रात्रीत महिनाभराचा पाऊस पडल्याने शहरातील रस्त्यांना अक्षरशः नदीचे स्वरूप आले आहे. परिस्थिती लक्षात घेता बारामती नगरपालिकेच्या शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.



बारामती शहराला मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. २ नोव्हेंबर रोजी पहाटेपासून सुरू झालेल्या पावसाचा जोर पुढील काही तास कायम होता. अवघ्या अडीच ते तीन तासांच्या मुसळधार पावसाने शहरातील अनेक भाग जलमय झाले. सकाळी सात वाजेपर्यंत शहरात तब्बल १५८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. अवघ्या काही तासांत इतका मोठा पाऊस झाल्याने शहरातील रस्त्यांवर पाणी साचले. अनेक रस्त्यांना नदीचे स्वरूप आले होते. भिगवण रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. अचानक आलेल्या पावसामुळे वाहनचालक आणि नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली.

पंढरपूर जिल्हा न्यायालयला बॉम्बची धमकी; परिसरात खळबळ!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर

दिनांक २ नोव्हेंबर रोजी न्यायालयाच्या अधिकृत ई-मेलवर बॉम्बस्फोटाची धमकी मिळाल्याची समोर आली खबरदारीचा उपाय म्हणून न्यायाधीश, वकील, आणि पक्षकारांना बाहेर काढून परिसर रिकामा करण्यात आला बॉम्बशोधक व नाशक पथकाकडून तपासणी सुरू असून धमकीच्या इमेलचा स्तोत्र आणि उद्देश शोधण्यासाठी पोलीस व सायबर यंत्रणा तपास करत आहेत धमकीचे स्वच्छता तपास यंत्रणेच्या तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

सोमवारी सकाळी न्यायालयीन कामकाज सुरू असताना न्यायालयाच्या अधिकृत ई-मेलवर बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा संदेश आल्याचे निदर्शनास आले.

या प्रकाराची माहिती मिळताच न्यायालय प्रशासनाने तत्काळ पोलिसांना कळविले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. न्यायालयातील न्यायाधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी तसेच विविध



खटल्यांच्या सुनावणीसाठी आलेले पक्षकार यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने बाहेर काढण्यात आले. त्यानंतर संपूर्ण न्यायालय परिसर रिकामा करण्यात आला.

धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्यानंतर बॉम्बशोधक व नाशक पथकाला पाचारण करण्यात आले. पोलिसांकडून न्यायालयाच्या इमारतीसह परिसराची कसून तपासणी करण्यात येत असून, कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. न्यायालयीन कामकाजावरही या घटनेचा परिणाम झाला आहे.

विशेष म्हणजे ठाणे, सातारा, सोलापूर आणि पंढरपूरसह राज्यातील विविध न्यायालयांना एकाच प्रकारचे धमकीचे ई-मेल प्राप्त झाल्याने या प्रकारामागे नेमके कोण आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. हा ई-मेल कोठून पाठविण्यात आला, त्यामागील उद्देश काय आणि धमकी देणाऱ्या व्यक्तीचा नेमका हेतू काय, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. सायबर यंत्रणेमार्फत ई-मेलचा तांत्रिक मागोवा घेण्याचे काम केले जात आहे.



दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

नाहक बळी

राजस्थानमधील झुंझुनू जिल्ह्यातील छपोली गावात रस्त्याचे काम सुरु असतानाच आठ कामगारांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. या अपघातात इतर पाच जण जखमी झाले. हा अपघात सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडला. रस्त्यावर काम करणाऱ्या एका ग्रॅव्हेल मिक्सर मशीनचा हायड्रॉलिक जॅक डोक्यावरील उच्च-दाब तारेला लागला. यामुळे मशीनमधून विद्युत प्रवाह वाहिला आणि कामगारांना विजेचा धक्का बसला. यामुळे नाहक कामगारांचा बळी गेल्याची चर्चा होत होती. ११ केव्हीची ही लाईन मूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु अलीकडेच ती बदलण्यात आली. अपघातानंतर गावकरी आंदोलन करत आहेत. गावकरी रोहिताश्व म्हणाले, ११ केव्हीची लाईन मूळतः रस्त्यापासून दूर होती, परंतु काही दिवसांपूर्वी ती रस्त्याच्या वरून हलवण्यात आली. सखल तारेमुळे हा मोठा अपघात घडला. हे काम वारंवार थांबवण्यात आले आहे. काम कोणतेही असो, सरकारला या गावात काही देणंघेणं नाही. गावकऱ्यांनी या कामासाठी पैसे गोळा केले होते. तरीही, सरकारी अधिकाऱ्यांनी आणि राजकारण्यांनी दोनदा काम थांबवले. खूप पाठपुरावा केल्यानंतरच काम पुन्हा सुरू करण्यात आले. प्राथमिक अहवालानुसार, पाच कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर तिघे गंभीररित्या भाजले. तथापि, पोलिसांनी नंतर मृतांची संख्या आठ असल्याचे सांगितले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय पथके घटनास्थळी दाखल झाली. मोठ्या संख्येने ग्रामस्थही घटनास्थळी जमले होते. स्थानिक लोकांच्या मदतीने मदत आणि बचाव कार्य करण्यात आले. अपघातानंतर, बांधकाम स्थळावरील सुरक्षेच्या व्यवस्थेबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

शाहीर अनंत फंदी: आडनाव फंदीची मजेदार कहाणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

(३ ते ९ नोव्हेंबर: शाहीर अनंत फंदी स्मृती दिन सप्ताह.)

शाहीर अनंत फंदी हे मराठीतील एक प्रख्यात कवी, शाहीर आणि 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक मानले जातात. त्यांच्याविषयी मूलभूत माहिती अशी- १ मूळ नाव: अनंत भवानीबावा घोलप- अनंत नामदेव फंदी. १ जन्म: १७४४, संगमनेर, जिल्हा अहमदनगर. १ कुटुंब: आई राऊबाई, पत्नी म्हाळसाबई; मुलगा सवाई फंदी-जो कवी व कीर्तनकार होता. १ कार्यकाळ: उत्तर पेशवाई- दुसरा बाजीराव पेशवा यांच्या काळातील दरबारी कवी. १ मृत्यू: दि. ३ नोव्हेंबर १८१९. १ ''फंदी'' हे आडनाव कसे पडले?: संगमनेरमध्ये ''मलकफंदी'' नावाचा एक चमत्कारिक वृत्तीचा फकीर राहत असे. अनंत फंदींचा त्याच्याशी स्नेह असल्याने लोक त्यांनाही ''फंदी'' म्हणू लागले. १ साहित्य आणि काव्य रचना: (१) फटका चे जनक: समाजातील गंभीर किंवा उपदेशपर गोष्टी कठोर व चपखल भाषेत मांडण्यासाठी त्यांनी ''फटका'' हा काव्यप्रकार रुजवला. (२) त्यांचा अत्यंत प्रसिद्ध उपदेशपर फटका: बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडू नको, संसारा मधी ऐस आपुला उगाच भटकत फिरू नको. (३) इतर रचना: त्यांनी लावण्या, पोवाडे, कटाव आणि ''श्रीमाधवनिधन'' हा ग्रंथ लिहिला. (४) विशेष रचना: ''रावबाजीवरील लावणी'' आणि ''नाना फडणविसांचा पोवाडा व फटका प्रचंड गाजले. (५) समकालीन गौरव: थोर शाहीर होनाजी बाळा यांनी अनंत फंदींचा गौरव फंदी अनंत कवनांचा सागर असा केला होता. सदर प्रेरणादायक संकलित लेख दिनविशेषकार- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींची प्रस्तुती जी... संपादक.

शाहीर अनंत फंदी यांच्याविषयी होनाजी बाळानी एक कविता लिहिली आहे ती काहीसी अशी-

फंदी अनंद कवनाचा सागर ।
ज्याचा हातखंडा चमत्कार।। चहूकडे चालतो, सृष्टींवर ज्याचा झेंडा ।।धृ०।।
आपले संगमनेर ठिकाण त्याचे,
र्ति उदय जैसा अर्की ।।
नवीन तर्हार नारळी डोईला ।
पदर पागोटयाची फिरकी ।।
वाचावंत संपत्ती, बहुतांचें तनमन हारकी ।।
लांगेलुंगे कवि दरले ।
अवघ्यात त्याची गुर्की ।।
छायाचित्र गातां कोणी टिकेना,
मनमर्धी बसली कर्की ।।
धन ज्याचा हातचा मळ ।
जरा तोच हांडा ।।च०।।
फंदी आनंदी छंदी वरदी । ब्राह्मण त्याव।।।।

उत्तर पेशवाईत विशेष गाजलेल्या शाहिरांपैकी सर्वांत जेष्ठ शाहीर. हे अहमदनगर नागरिक संगमनेर येथे राहणारे, अजूनही संगमनेर येथे अनंत फंदी व्याख्यानमाला असते. अनंत फंदी आडनाव घोलप. हे यजुर्वेदी कोंड्य गोत्री ब्राह्मण होते.

: पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा आणि सराफी याचाही होता. अनंत फंदी यांनी बर्याच केल्याने; त्यांचे काही अनुवाद प्रसिद्ध आहेत. त्यानंतर अनंत फंदी यांनी तमाशा केला. त्यांचे तमाशे संघर्षवादी होते, एक मलकफंदी साथी, रतनफंदी, तिसरे राघवफ आणि चवथे हे अनंतफंदी. हे सांगितलेले चौघे फंदी तमशा खालकरशाहीत गेले. ये कीर्तन करू, अशी आख्यायिकाही रूढ झाली आहे.

फंदीस फंदी नाव पडण्याचे कारण, पूर्वी संगमनेर येथे मलकफंदी म्हणून एक फकीर रहात होता. तो नेहमीं लोकांत चमत्कारिक रीतीनें वागत असे म्हणून त्यास फंदी म्हणत. त्या फकिराचा आणि अनंत फंदीचा स्नेह असे. यावरून लोक फंदी म्हणे असे चिडवत. 'वेड अनंत फंदीस लागले'' फंदी अनंतकवन सागर'' आणि ''गातां कोण टिकेना'' असा होनाजी बाळानी गौरव केला होता. या कवनसागरातील फारच कवने आज उपलब्ध आहेत. त्यातील पदे, प्रदेश, कटाव, फटके इ. विविध प्रकारची रचना रसाळ व प्रासादिक आहे. लुंडे हिरसे तट्टू' हा त्यांचा उपदेशपर फटका विशेष लोकप्रिय आहे. त्यांची श्रीमाधवनिधन ग्रंथ ही ओवीबद्ध काव्य रचना. या काव्यात सहा अध्याय उपलब्ध आहेत, बाजीरावाची प्रथमची मर्जी होती. 'रावबाजीवर लावणी, नाना नंदीचा पोवाडा आणि फटका हे विशेष नावजले. त्यांना 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक म्हणतात. फटका बघा-

हिमायती गरिबगुरिबाला,
गुरकावों नको ।।
दोन दिवसांची जाइल सत्ता,
असफल माथां घेउं नको ।।
खूप कर्जबाजारी होउनि,
बोज आपुला दवडुं नको ।।
र्य संध्येतील २४ नावे उघडकीस म्हणून ओळखा, असे म्हटल्यावर फंदीने डफ मारून त्वरित रचना केली अशी आख्यायिका सांगतात. शार्दूलविक्रीडित, शिखरिणी या वृत्तांत त्यांनी रचना केल्या आहेत. अनंत फंदींचा मुलगा सवाई फंदी हे कवी व कीर्तनकार होते. काही रचना अनंत समाजाला बळजबरी पटवून देणे/सांगणे, म्हणजे फटका होय. फटका काव्यप्रकाराचे जनक म्हणजे कवी अनंतफंदी! कवी अनफंदीचे अनेक फटके प्रसिद्ध आहेत. त्यांतील एक उपदेशपर फटका-

बिकट वाट वहिवाट नसती,
सोडुं नको!!
ऐस आपुला उगाच, भटकत फिरूं नको !!

फंदी हे संगमनेर येथे राहत होते. त्यांचे आडनाव घोलप असे होते. हे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात होऊन गेले. अनंतफंदींच्या आईचे नाव राऊबाई आणि पत्नीचे म्हाळसाबई. अनंत फंदींच्या पूर्वजांचा गोंधळीपणाचा व सराफीचाही धंदा होता. अनंत फंदींनी पुढे बऱ्याच लावण्या केल्या; त्यांतील कांहीं प्रसिद्ध आहेत. नंतर त्यांनीं तमाशा आरंभिला व नंतर तमाशा सोडला. त्यांचे तमाशांतील साथी एक मलकफंदी, दुसरे रतनफंदी, तिसरे राघवफंदी आणि चौथे हे अनंतफंदी होत. अनंतफंदीस फंदी नांव पडण्याचें कारण, पूर्वी संगमनेर येथें मलकफंदी म्हणून एक फकीर होता. तो नेहमीं लोकांत चमत्कारिक रीतीनें वागत असे म्हणून त्यास फंदी म्हणत. त्या फकिराचा आणि अनंतफंदीचा स्नेह असे. यावरून यासही लोक फंदी म्हणूं लागले. वर सांगितलेले चौघे फंदी तमाशा घेऊन होळकरशाहीत गेले. अनंत फंदींनी आठ लावण्या व काही पोवाडे रचले. त्यांची 'रावबाजीवरील लावणी, नाना फडणवीसाचा पोवाडा व फटका हे विशेष नावाजले. त्यांना 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक म्हटले जाते. शंकराचार्यांच्या संध्येतील २४ नावे म्हणून दाखव, असे म्हटल्यावर फंदींनी डफावर थाप मारून शीघ्र रचना केली, अशी आख्यायिका सांगतात. शार्दूलविक्रीडित, शिखरिणी या वृत्तांत त्यांनी रचना केल्या आहेत. एक फटका असाही-

संसाराधीं ऐस आपला,
उगा भटकत फिरू नको ।।
बुडालां वर्म काढुनी,
ठाव नको ।।
मी मोठा शहाणा जगामधि,
गर्व हा वाहुं नको ।।
एकाहुनि एक चढी जगमधि,
थोरपणाला मिरवुं नको ।।

उत्तर पेशवाईत विशेष गाजलेल्या शाहिरांपैकी सर्वांत जेष्ठ शाहीर. हे अहमदनगर नागरिक संगमनेर येथे राहणारे, अजूनही संगमनेर येथे अनंत फंदी व्याख्यानमाला असते. अनंत फंदी आडनाव घोलप. हे यजुर्वेदी कोंड्य गोत्री ब्राह्मण होते. एका फटका-

स्नेह्यासाठी पदरमोड कर,
भिडून राहुं नको ।।
पैजेचा कुणि मां गुरकाव,
तर बुहाणूं बुहाणूं नको।।
नसणें प्रदेशला गांव तुझा,
भीड धरूं दुःख नको ।।
बरि भाजिभाकरी,
चि चोरि नको ।।

स्थिती: पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा आणि सराफी याचाही होता. अनंत फंदी यांनी बर्याच केल्याने; त्यांचे काही अनुवाद प्रसिद्ध आहेत. त्यानंतर अनंत फंदी यांनी तमाशा केला. त्यांचे तमाशे संघर्षवादी होते, एक मलकफंदी साथी, रतनफंदी, तिसरे राघवफ आणि चवथे हे अनंतफंदी. हे सांगितलेले चौघे फंदी तमशा खालकरशाहीत गेले. हे कीर्तन करू, अशी आख्यायिकाही रूढ झाली आहे. एक गीत -

सालसपण धरुनि निखालस
खोटं बोल बोलूं नको ।।
अंगात घेउं सदा भारुं
भाऊं शिवरां घेउनी ।।ध्रु।।
कांही अधर्ममार्गीं नको मायबाडून,
शिरूं पण रुसूं नको।।
दूर एकला बसूं नको
व्यवहारा फसूं नको ।।।।
कधीं रिकामा असूं नको
परि उलाढाली भलत्यासलत्या पोटीं करूं नको ।।

अनंतफंदीस फंदी नाव पडण्याचे कारण, पूर्वी संगमनेर येथे मलकफंदी म्हणून एक फकीर रहात होता. तो नेहमीं लोकांत चमत्कारिक रीतीनें वागत असे म्हणून त्यास फंदी म्हणत. त्या फकिराचा आणि अनंत फंदीचा स्नेह असे. यावरून लोक फंदी म्हणे असे चिडवत. 'वेड अनंत फंदीस लागले'' फंदी अनंतकवन सागर'' आणि ''गातां कोण टिकेना'' असा होनाजी बाळानी गौरव केला होता. या कवनसागरातील फारच कवने आज उपलब्ध आहेत. त्यातील पदे, प्रदेश, कटाव, फटके इ. विविध प्रकारची रचना रसाळ व प्रासादिक आहे. लुंडे हिरसे तट्टू' हा त्यांचा उपदेशपर फटका विशेष लोकप्रिय आहे. त्यांची श्रीमाधवनिधन ग्रंथ ही ओवीबद्ध काव्य रचना. या काव्यात सहा अध्याय उपलब्ध आहेत, बाजीरावाची प्रथमची मर्जी होती. 'रावबाजीवर लावणी, नाना नंदीचा पोवाडा आणि फटका हे विशेष नावजले. त्यांना 'फटका' या काव्यप्रकाराचे जनक म्हणतात. फटका नमुना-

सुविचारा कातरूं नको।।
अंतरूं नको ।।
द्वैताला अनुसरू नको ।।
हरिभजना विस्मरूं नको ।।
गावयास अनंतफंदिचे फटके मागे सरूं नको ।।
सत्कीर्तिनौबदिचा डंका गाजे मग शंकाच नको ।।

र्य संध्येतील २४ नावे उघडकीस म्हणून ओळखा, असे म्हटल्यावर फंदीने डफ मारून त्वरित रचना केली अशी आख्यायिका सांगतात. शार्दूलविक्रीडित, शिखरिणी या वृत्तांत त्यांनी रचना केल्या आहेत. अनंत फंदींचा मुलगा सवाई फंदी हे कवी व कीर्तनकार होते. काही रचना अनंत समाजाला बळजबरी पटवून देणे/सांगणे, म्हणजे फटका होय. फटका काव्यप्रकाराचे जनक म्हणजे कवी अनंतफंदी! कवी अनफंदीचे अनेक फटके प्रसिद्ध आहेत. त्यांतील एक उपदेशपर फटका-

बिकट वाट वहिवाट नसती,
धोपट सोडुं नको!!

संसाराधी ऐस आपुला उगाच, भटकत फिरूं नको !!

अनंत फंदी हे संगमनेर येथे राहत होते. त्यांचे आडनाव घोलप असे होते. हे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात होऊन गेले. अनंतफंदींच्या आईचे नाव राऊबाई आणि पत्नीचे म्हाळसाबई. अनंत फंदींच्या पूर्वजांचा गोंधळीपणाचा व सराफीचाही धंदा होता. अनंत फंदींनी पुढे बऱ्याच लावण्या केल्या; त्यांतील कांहीं प्रसिद्ध आहेत. नंतर त्यांनीं तमाशा आरंभिला व नंतर तमाशा सोडला. त्यांचे तमाशांतील साथी एक मलकफंदी, दुसरे रतनफंदी, तिसरे राघवफंदी आणि चौथे हे अनंतफंदी होत. अनंतफंदीस फंदी नांव पडण्याचें कारण, पूर्वी संगमनेर येथें मलकफंदी म्हणून एक फकीर होता. तो नेहमीं लोकांत चमत्कारिक रीतीनें वागत असे म्हणून त्यास फंदी म्हणत. त्या फकिराचा आणि अनंत फंदीचा स्नेह असे. यावरून यासही लोक फंदी म्हणूं लागले. वर सांगितलेले चौघे फंदी तमशा घेऊन होळकरशाहीत गेले. अनंत फंदींनी आठ लावण्या व काही पोवाडे रचले. त्यांची 'रावबाजीवरील लावणी, नाना फडणवीसाचा पोवाडा व फटका हे विशेष नावाजले. त्यांना ''फटका'' या काव्यप्रकाराचे जनक म्हटले जाते. शंकराचार्यांच्या संध्येतील २४ नावे म्हणून दाखव, असे म्हटल्यावर फंदींनी डफावर थाप मारून शीघ्र रचना केली, अशी आख्यायिका सांगतात. शार्दूलविक्रीडित, शिखरिणी या वृत्तांत त्यांनी रचना केल्या आहेत.

दिली स्थिती देवानें तींच,
मानीं सुखीं विटूं नको ।।
हि अतिथा मुठ द्याया,
पुढती पाहुं उगिच निंदा तुझी ही,
स्वहितें करु नको ।।
ओसरूं नको।।
याने गांठीं धनसंचय कर,
र्यी व्यया हटूं नको ।।

महान शाहीर अनंत फंदी यांचे दि. ३ नोव्हेंबर १८१९ रोजी निधन झाले. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!!! ज्येष्ठ व श्रेष्ठ शाहीर अनंत फंदी यांना व त्यांच्या अजरामर शाहीरीस स्मृतिदिनानिमित्त सप्ताहभर विनम्र अभिवादन जी !!!

– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
गुरुजी.
(दिनविशेषकार)
राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.

टाकळीवाडीच्या विद्यार्थ्याची परदेशात भरारी! ओमानमध्ये इलेक्ट्रिकल प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून संधी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



टाकळीवाड/प्रतिनिधी : टाकळीवाडी येथील विद्या मंदिर या जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करून आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर परदेशात भरारी घेणाऱ्या गावातील विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्राथमिक शिक्षण विद्या मंदिर टाकळीवाडी येथे, तर माध्यमिक शिक्षण बाहुबली विद्यापीठ संचलित सरस्वती हायस्कूल येथे पूर्ण केले. त्यानंतर डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूटमधून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले.

विद्या मंदिर टाकळीवाडीचा माजी विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकला; गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा

शिक्षणानंतर २०१४ मध्ये त्यांनी जेएसडब्ल्यू स्टील या नामांकित कंपनीमध्ये आपल्या नोकरीची सुरुवात केली. आपल्या कामातील कौशल्य, अनुभव आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी आतापर्यंत दोन भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्या (खपवळरप चछउ) आणि एका अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये (णड चछउ) काम करण्याचा अनुभव मिळवला आहे.

आता त्यांच्या कारकिर्दीला आणखी एक नवी दिशा मिळाली असून, ओमान या देशातील जिंदाल स्टील प्लांटमध्ये इलेक्ट्रिकल प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून काम करण्याची महत्त्वपूर्ण संधी त्यांना मिळाली आहे.

टाकळीवाडीसारख्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतून शिक्षणाची सुरुवात करून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणे ही गावासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या या यशामुळे विद्या मंदिर टाकळीवाडी शाळेच्या शैक्षणिक परंपरेचा गौरव वाढला असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

त्यांच्या या यशाबद्दल टाकळीवाडी ग्रामस्थ, शिक्षकवृंद, मित्रपरिवार आणि नातेवाईकांकडून अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

विशेष : विद्या मंदिर टाकळीवाडीचा माजी विद्यार्थी आज आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा झेंडा फडकवत आहे, ही संपूर्ण गावासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

कळंब तालुक्यात वीटभट्टी, ऊसतोड मजुरांचे सर्वेक्षण करा; लहुजी शक्ती सेनेची तहसीलदारांकडे मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधी : परंडा तालुक्यात उघडकीस आलेल्या माणुसकीला काळिमा फासणाऱ्या वेठबिगारीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर लहुजी शक्ती सेना आक्रमक झाली आहे कळंब तालुक्यात अशा घटना घडू नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश महासचिव बालाजी भाऊ गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली कळंब चे तहसीलदार हेमंत ढोकले यांना निवेदन देण्यात आले. दिलेल्या

निवेदनात असे म्हटले आहे की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २३ नुसार वेठबिगारी हा दंडनीय अपराध असून वेठबिगार पद्धत (निर्मूलन) अधिनियम, १९७६ च्या कलम ४ नुसार ती पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. मात्र कळंब तालुक्यातील वीटभट्ट्या, ऊसतोडीचे फड आणि मोठ्या शेतातील सालगडी मजुरांची आजपर्यंत कोणतीही अधिकृत नोंदणी व सर्वेक्षण प्रशासनाने केलेले नाही. त्यामुळे शेकडो मजूर किमान वेतनापासून वंचित आहेत.

त्यामुळे कळंब तालुक्यातील सर्व वीटभट्ट्या, ऊसतोड टोळ्यांचे तात्काळ संयुक्त सर्वेक्षण करावे, अधिनियमाच्या कलम १३ अन्वये उपविभागीय दक्षता समितीची तातडीची बैठक घेऊन कलम १४ नुसार मुक्तता व पुनर्वसनाचा आराखडा तयार करावा आणि बैठकीचे इतिवृत्त संघटनेला लेखी स्वरूपात द्यावे, आंतरराज्य स्थलांतरित कामगार अधिनियम १९७९ व किमान वेतन कायद्यानुसार सर्व मजुरांची नोंदणी करावी, तसेच अन्याय-अत्याचार आढळल्यास वेठबिगार अधिनियम कलम १६ ते २० व भारतीय न्याय संहिता १४३/१४४ (मानवी तस्करी) अन्वये कठोर फौजदारी कारवाई करावी.

सदर निवेदनावर कार्यवाही न झाल्यास कळंब तहसील कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.



या निवेदनावर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश महासचिव बालाजी गायकवाड,मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत पाटुळे, संतोष कसबे, विठ्ठल ताटे, मंगल पवार, संजय कांबळे, विनोद चव्हाण, सुनील ताटे, श्रीमंत माळी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दिव्यांग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल; साईनाथ पवार यांना डॉक्टरेट पदवीसह 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



पनवेल/केतन भोज : दिव्यांग बांधवांच्या सेवेसाठी अनेक वर्षांपासून समर्पित भावनेने कार्य करणारे साईनाथ पवार यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत लुइझियाना रिसर्च युनिव्हर्सिटी यांच्याकडून दिव्यांग क्षेत्रातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करून पुणे येथे सन्मानित करण्यात आले.त्यांच्या कार्याचा हा गौरव संपूर्ण दिव्यांग क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरत आहे.विशेष म्हणजे,साईनाथ पवार हे स्वतः दिव्यांग असूनही त्यांनी आपल्या शारीरिक मर्यादांवर मात करत अनेक वर्षांपासून दिव्यांग बांधवांच्या हक्कांसाठी,विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्य केले आहे. दिव्यांगांच्या समस्या जाणून घेणे,त्यांना योग्य मार्गदर्शन करणे,विविध शैक्षणिक व प्रशिक्षण उपक्रमांमध्ये सहभाग घेणे,तसेच दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.सामाजिक कार्यासोबतच त्यांनी विविध शिक्षण व प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपले ज्ञान आणि कौशल्य अधिक समृद्ध केले आहे.त्यांच्या याच सेवाभावी कार्याची आणि कर्तृत्वाची दखल घेत त्यांना



डॉक्टरेट पदवीने गौरविण्यात आले.याच गौरवशाली कामगिरीबद्दल भारतीय अवॉर्ड कौन्सिलच्या वतीने साईनाथ पवार यांना पुणे येथे 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.एका दिव्यांग व्यक्तीने स्वतःच्या संघर्षातून समाजसेवेचा आदर्श निर्माण करत मिळवलेले हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या या दुहेरी सन्मानामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग बांधव,सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षाव होत आहे. संघर्षाला जिद्दीची जोड आणि सेवेला समर्पणाची साथ मिळाली की यशाची शिखरे गाठता येतात,याचे जिवंत उदाहरण म्हणजे साईनाथ पवार!

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दुसरबीड पाणीपुरवठ्याचा प्रश्न अखेर मार्गी लागणार

आमदार मनोज कायदे यांच्याकडून निधी मंजूर; जुनेद अली यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क





राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील दुसरबीड गावाचा गंभीर बनलेला पाणीप्रश्न आता कायमचा सुटण्याच्या मार्गावर आहे. मांडवा धरणातून दुसरबीड गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी व आवश्यक पाईपलाईनच्या कामासाठी सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज कायदे यांनी निधी मंजूर केला आहे. यामुळे दुसरबीडकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सध्या खडकपूर्णा व परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पूर्णा नदी पूर्णपणे कोरडी पडल्यामुळे गावातील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत होते. या बिकट परिस्थितीत गावातील पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी स्थानिक सामाजिक कार्यकर्ते तथा माजी संचालक खरेदी विक्री संघ सिंदखेडराजा जुनेद अली यांनी पुढाकार घेतला.

उपोषण अन् सातत्यपूर्ण पाठपुरावा

पाणीप्रश्न सोडवण्यासाठी जुनेद अली यांनी वर्ष २०२३-२४ मध्ये आमरण उपोषणही केले होते. तसेच मांडवा धरणात अजूनही ६० टक्क्यांहून अधिक पाणीसाठा शिल्लक असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. जर धरणातून येणारी जुनी नळ योजनेची पाईपलाईन दुरुस्त केली, तर दुसरबीडच्या नागरिकांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटू शकतो, हा तांत्रिक व व्यवहार्य पर्याय त्यांनी मांडला. या मागणीसाठी त्यांनी आमदार मनोज कायदे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला.

आमदारांकडून मागणीची दखल घेत; निधी मंजूर करुन

जुनेद अली यांनी मांडलेल्या रास्त मागणीची आणि ग्रामस्थांच्या हाल अपेष्टांची गंभीर दखल घेत आमदार मनोज कायदे यांनी जुन्या जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी तात्काळ मंजूर केला आहे.

आमदार मनोज कायदे यांच्या या निर्णयामुळे गावातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम आणि सुरळीत होण्यास मदत होणार असून, दुसरबीडकरांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय दूर होणार आहे. सामाजिक कार्यकर्ते मां.संचालक खरेदी विक्री संघ सिंदखेडराजा जुनेद अली यांच्या सकारात्मक पाठपुराव्यामुळे गावाच्या मूलभूत विकासाचा प्रश्न मार्गी लागल्याने दुसरबीड शहरातून समाधान व्यक्त होत आहे.

सुंदरपूर येथे गळीत धान्य शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



निफाड/प्रतिनिधी : निसर्गाच्या लहरीपणावर आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करत रब्बी हंगामात पिकांचे उत्तम व्यवस्थापन कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सुंदरपूर येथे 'गळीत धान्य शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम चे* ' नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल सविस्तर माहिती दिली.

या प्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक डॉ. भरत मालुंजकर वरिष्ठ संशोधन सहायक - कृषिविद्या, कृषि संशोधन केंद्र, कुंदेवाडी,* निफाड यांनी शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीत रब्बी पिकांचे नियोजन कसे करावे, याबाबत माहिती दिली पिक निवड : कमी पाणी लागणाऱ्या पिकांची निवड करावी; जसे की हरभरा, ज्वारी आणि कमी पाण्यावर येणारा गहू. तसेच सिंचन तंत्रज्ञान:* पाणी देण्यासाठी तुषार सिंचन किंवा ठिबक सिंचनाचा वापर करावा. उसासारख्या पिकास 'सरी आड सरी' पद्धतीने पाणी द्यावे. तसेच पाचटाचे व्यवस्थापन:* ऊस पिकातील पाचट कधीही जाळू नये, त्याचा आच्छादन म्हणून वापर करावा. यामुळे पाचट कुजून उत्तम सेंद्रिय खत तयार होते आणि जमिनीची सुपीकता वाढते.

दुष्काळी परिस्थितीत रब्बी हंगाम व्यवस्थापनावर मार्गदर्शन

पिकांवर पाण्याचा ताण पडल्यास १३:०:४५ या विद्राव्य खताची १% तीव्रतेची फवारणी करावी. व उत्पादन खर्च कमी करण्यासाठी नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा. यात बीजमृत, जीवामृत, घनजीवामृत तसेच निमास्त्र, ब्रह्मास्त्र, अग्निअस्त्र आणि दशपर्णी अर्क यांसारख्या जैविक कीटकनाशकांचा वापर करावा. तसेच जनावरांना मुबलक चारा उपलब्ध मिळण्यासाठी रब्बी हंगामात मका, ज्वारी, ओट, लसूण घास, बरसिम इत्यादी चारा पिकांची लागवड करावी.

पिकांच्या कडेने उंच वाढणारी शेवरीसारख्या पिकांच्या आळी लावाव्यात. तसेच पिकांना आच्छादनाचा वापर करावा, जेणेकरून बाष्पीभवन कमी होऊन पाण्याची गरज रोखता येईल.

शेतकऱ्यांना महत्त्वाची माहिती दिली याप्रसंगी . जे. आर. क्षीरसागर मंडळ कृषी अधिकारी, पिंपरी आत्मा'चे संदीप बच्छाव, सहायक कृषी अधिकारी . योगेश पाटील, तसेच सोमेश्वर नैसर्गिक शेती गटाचे सर्व सदस्य आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे दुष्काळी परिस्थितीत रब्बी हंगामाचे नियोजन कसे करावे, याची दिशा मिळाल्याबद्दल उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे उपक्रमशील व कर्तव्यदक्ष शिक्षक धनराज पवार यांची राज्यस्तरीय 'आयडॉल शिक्षक' म्हणून निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



धाराशिव: प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळे दुमाला (ता. धाराशिव) येथील उपक्रम शील,ध्येयवादी आणि कर्तव्यदक्ष शिक्षक श्री. धनराज रंगनाथ पवार यांची शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (डउएठढ), पुणे यांच्या वतीने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी 'आयडॉल शिक्षक' (खवेश्र ढशरलहशी) म्हणून गौरवपूर्ण निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद शाळेतील त्यांच्या उल्लेखनीय आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्याची दखल घेऊन राज्यस्तरावरून हा बहुमान जाहीर झाला आहे.

'आयडॉल शिक्षक' म्हणजेच विद्यार्थ्यांचे लाडके आणि आदर्श गुरू, जे विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने प्रेरणास्थान असतात. ज्यांची शिक्षण देण्याची अनोखी पद्धत, प्रेमळ स्वभाव आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व विद्यार्थ्यांना आयुष्यात पुढे जाण्यासाठी सतत प्रेरित करते, अशा आदर्श गुणांनी परिपूर्ण असणाऱ्या शिक्षकांची या सन्मानासाठी निवड केली जाते.

श्री. पवार यांनी आपल्या अध्यापन कार्यात विविध नाविन्यपूर्ण प्रयोग राबवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली. त्यांच्या या यशामुळे शिक्षण वर्तुळासह संपूर्ण परिसरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे

बोरीवली ग्रामपंचायतीत आयुष्मान भारत कार्ड नोंदणी शिबिर संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : 'सशक्त पंचायत, समृद्ध महाराष्ट्र' या संकल्पनेतून राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायत येथे आयुष्मान भारत योजना कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ५९ रहिवाशांची आयुष्मान भारत योजनेच्या कार्डसाठी नोंदणी करण्यात आली.

सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यविषयक शासकीय योजनांची माहिती मिळावी तसेच पात्र लाभार्थ्यांना आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेता यावा, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्यविषयक आर्थिक अडचणींच्या काळात आयुष्मान भारत योजना नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरत असून, पात्र लाभार्थ्यांना या योजनेच्या माध्यमातून उपचारासाठी आर्थिक संरक्षण मिळण्यास मदत होते. त्यामुळे अधिकाधिक पात्र नागरिकांनी योजनेची माहिती घेऊन नोंदणी करून घ्यावी, या दृष्टीने अशा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित होत आहे.

या शिबिराला बोरीवली ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव, बोरीवली ग्राम पंचायतीचे माजी सदस्य तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी नागरिकांना कार्ड नोंदणी प्रक्रियेसाठी आवश्यक सहकार्य करण्यात आले. शिबिरात ५९ रहिवाशांची नोंदणी झाल्याने ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका व मदतनीस, महिला बचत गटांच्या प्रतिनिधी तसेच आपले सरकार सेवा केंद्राच्या प्रतिनिधींनी विशेष सहकार्य केले. विविध घटकांच्या समन्वयातून शिबिराचे कामकाज पार पडले.



भिवंडी मनपात दिवाळी बोनसवरून वाद पेटला; ३० हजारांच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांचा ४ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा

प्रशासनाच्या दिरंगाईवर कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ आक्रमक; पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य सेवाही बंद ठेवण्याचा इशारा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या दिवाळी सानुग्रह अनुदानावरून (बोनस) आता वाद चिघळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यंदा सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना सरसकट ३० हजार रुपये दिवाळी बोनस देण्यात यावा, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या भिवंडी युनिटने आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रशासनाकडून वारंवार निवेदने देऊनही मागणीची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत महासंघाने येत्या ४ नोव्हेंबर २०२६ पासून अत्यावश्यक सेवांसह बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनासमोर नवे आव्हान उभे राहिले आहे.

महासंघाचे अध्यक्ष दिपक सखाराम राव यांनी यासंदर्भात महापालिका आयुक्त, महापौर, अतिरिक्त आयुक्त तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनात प्रशासनाच्या दिरंगाईबद्दल नाराजी व्यक्त करत कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हिताच्या मागणीवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

महासंघाने दिलेल्या माहितीनुसार, भिवंडी महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दरवर्षी दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान दिले जाते. मात्र, यंदा वाढीव दराने बोनस मिळावा यासाठी महासंघाने २३ मार्च २०२६ रोजीच प्रशासनाकडे पहिले निवेदन सादर केले होते. त्यानंतर २१ ऑगस्ट, २१ सप्टेंबर आणि १३ ऑक्टोबर २०२६ रोजी स्मरणपत्रे देऊनही प्रशासनाकडून ठोस निर्णय घेण्यात आला नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

दरम्यान, २१ ऑक्टोबर २०२६ रोजी महापौर आणि महापालिका आयुक्त यांच्या उपस्थितीत विविध कर्मचारी संघटनांची संयुक्त बैठक पार पडली होती. या बैठकीत बोनसच्या प्रश्नावर चर्चा झाली असली तरी बैठकीचे अधिकृत इतिवृत्त (मिनिट्स) अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही, अशी महासंघाची तक्रार आहे. त्यामुळे बैठकीत नेमके कोणते निर्णय घेण्यात आले, याबाबत संभ्रम निर्माण झाला असून, ही बैठक केवळ कर्मचाऱ्यांची दिशाभूल करण्यासाठी होती का, असा सवालही महासंघाने उपस्थित केला आहे.

महासंघाच्या प्रमुख मागणीनुसार, महापालिकेतील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना यंदा कोणताही भेदभाव न करता सरसकट ३० हजार रुपये दिवाळी सानुग्रह अनुदान देण्यात यावे. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता न मिळाल्यास आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागेल, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.

विशेष म्हणजे, मागणी मान्य न झाल्यास ४ नोव्हेंबरपासून सर्व अधिकारी-कर्मचारी अत्यावश्यक सेवांसह बेमुदत संपावर जातील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या संपामुळे शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य व्यवस्था आणि महापालिकेच्या इतर अत्यावश्यक नागरी सेवा विस्कळीत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अत्यावश्यक सेवांवर परिणाम झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महापालिका प्रशासन आणि महापौर यांची राहील, असेही महासंघाने निवेदनात नमूद केले आहे.

एकीकडे कर्मचाऱ्यांचा वाढीव बोनससाठीचा आग्रह, तर दुसरीकडे महापालिका प्रशासनाची भूमिका यामुळे हा प्रश्न आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. ३० हजार रुपयांच्या बोनसच्या मागणीवर प्रशासन काय निर्णय घेते आणि संप टाळण्यासाठी कोणती भूमिका घेते, याकडे भिवंडीकरांचे लक्ष लागले आहे. विशेषतः अत्यावश्यक नागरी सेवा बाधित होऊ नयेत, यासाठी प्रशासनाने कर्मचारी संघटनांशी तातडीने चर्चा करून तोडगा काढण्याची गरज व्यक्त होत आहे.

कुमार विद्यामंदिर ते एनडीएपर्यंत वेदांत मानेची यशस्वी झेप



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी येथील वेदांत गंगाधर माने याने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याची शैक्षणिक वाटचाल कुमार विद्यामंदिर, टाकळीवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत पहिली ते सातवीपर्यंत झाली. त्यानंतर आठवी, नववी व दहावीचे शिक्षण बाहुबली विद्यापीठ संचलित श्री सरस्वती हायस्कूल, टाकळीवाडी येथे पूर्ण केले.

अवघ्या पाच महिन्यांत एनडीए भरती प्रक्रियेत यशस्वी निवड; टाकळीवाडीच्या शिरपेचात मानाचा तुरा

जून २०२६ मध्ये त्याने गारगोटी येथील मौनी विद्यापीठात अकरावीच्या वर्गात प्रवेश घेतला. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी अॅकॅडमीतही प्रवेश घेतला. शिक्षणासोबतच देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून त्याने एनडीए भरती प्रक्रियेसाठी प्रयत्न सुरू केले. अवघ्या पाच महिन्यांच्या तयारीनंतर त्याची एनडीए भरती प्रक्रियेत निवड झाली.

अल्पावधीत मिळवलेले हे यश त्याच्या मेहनतीचे, आत्मविश्वासाचे आणि ध्येयाप्रती असलेल्या समर्पणाचे प्रतीक आहे. वेदांतच्या या यशामुळे टाकळीवाडी गावासह शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर मोठे यश मिळवता येते, हे वेदांत माने याने दाखवून दिले आहे.

महिला विकास कक्ष व अँटी रॅगिंग विभाग आयोजित कायदेविषयक कार्यशाळा

मुलींनो कायदा सक्षम असल्यामुळे रॅगिंग सारखे छळ सहन करू नका : ॲड. सोनाली कटकधोंड



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : भारताच्या संविधानाने मुलींना सुरक्षित जीवन जगण्याचा हक्क दिला आहे, न्याय संहितेमध्ये कडक कायदे करण्यात आले आहेत, म्हणून मुलींनी रॅगिंग व छेडछाड सहन करू नये कायद्याचा आधार घेऊन अन्यायाविरुद्ध खंबीर भूमिका घेतली पाहिजे असे प्रतिपादन ड सोनाली कटकधोंड यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील महिला विकास कक्ष व अँटी रॅगिंग समितीच्या वतीने कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे, प्रा मनीषा शिंदे, प्रा हर्षदा गायकवाड उपस्थित होते.

प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे म्हणाले की, मुलीं व महिलांसाठी शाळा महाविद्यालय, रेल्वे स्टेशन, बस स्थानके, सरकारी व खाजगी कार्यालये आदी ठिकाणी कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. नुकतेच हायकोर्टाने मासिक पाळीच्या वेळी हक्काची आणि सुरक्षित जागा मिळावी म्हणून पिंक रूम या विशेष कक्षाची संकल्पना प्रत्यक्षात आणावी असा आदेश दिला आहे. पिंक रूम ही महिलांच्या आत्मसन्मानाची आरोग्याची व सुरक्षिततेची हमी देणारी प्रभावी व्यवस्था आहे असे हायकोर्टाने म्हटले आहे. तिचा महिलांनी उपयोग करून घेतला पाहिजे.

मनीषा शिंदे म्हणाले की, महिलाचा सन्मान करणे ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकांचे सामाजिक व नैतिक कर्तव्य आहे. अशा कार्यशाळेमुळे महाविद्यालयीन परिसर अधिक सुरक्षित संवेदनशील व भेदभाव मुक्त होईल असा विश्वास वाटतो.

कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन कुमारी स्नेहा गायकवाड यांनी केले तर आभार प्राध्यापिका ऐश्वर्या तारापुरे यांनी मानले.

महिलांना कायद्याचे कवच

हिंसाचारापासून संरक्षण कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा,लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, बालविवाह कायदा, अँटी रॅगिंग या सारख्या कायद्याचे कवच महिलांना देण्यात आले आहेत, त्यामुळे महिला सुरक्षित असून अन्याय, अत्याचार, शोषण आणि भेदभाव दूर झाले आहेत. असे प्रतिपादन ड सोनाली कटकधोंड यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

नगराध्यक्ष डॉ. प्रणिता भालके यांची कर्मचाऱ्यांना दिवाळीसाठी खास भेट

नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांची दिवाळी होणारा अधिक गोड; अनुग्रह अनुदनात अडीच पट वाढ, आता मिळणार बारा हजार पाचशे रुपये; ५००० ऐवजी १२५०० ची घोषणा



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : वर्षभर शहराच्या सेवेसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात आणि उत्साहात साजरी व्हावी, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पंढरपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी कर्मचाऱ्यांना दिवाळीची अनोखी भेट दिली आहे. दरवर्षी दिल्या जाणाऱ्या पाच हजार रुपयांच्या अनुभवा अनुदानात अडीच पट वाढ करून इंदा प्रत्येक कर्मचाऱ्यांना १२,५०० देण्याची घोषणा त्यांनी केली त्यांच्या या निर्णयामुळे नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांची दिवाळी अधिक गोड होणार आहे.

शहर स्वच्छ ठेवण्यापासून नागरिकांना विविध नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यापर्यंत नगरपरिषदेची कर्मचारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यांच्या कष्टाची, हो मेहनतीची आणि योगदाना-ची जाणीव ठेवून सणासुदीच्या काळात त्यांच्या आनंदात भर घालण्याचा संवेदनशील निर्णय नगराध्यक्षानी घेतला.

दिवाळी हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण आहे हा आनंद केवळ काही घराप-ुरता मर्यादित न राहता सर्वसाम ान्याच्या घरापर्यंत पोहोचवा ही भूमिका डॉक्टर प्रणिती ताई भगीरथ भालके यांनी आपल्या निर्णयातून अधोरेखित केली आहे. कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाची दिवाळीचा आनंद देऊनच व्ह-ावा, या उद्देशाने अनुग्रह अन-ुदानात केलेली ही भरीव वाढ निश्चित कौतुकास्पद आहे.

सामाय बांधिलकी जपत सर्वसामान्यांच्या सुखदु:खात सहभागी होणाऱ्या आणि आपल्या निर्णयातून प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारे नेतृत्व असावे तर असे! पद हे केवळ जबाबदारी म्हणून न पाह-ता प्रत्येक घटकाच्या आनंदाचा विचार करणाऱ्या नगराध्यक्ष डॉक्टर पनीतीताई भालके यांनी या निर्णयापासून संवेदनशील नेतृत्वाचा प्रत्येक दिला आहे. त्यांचे दिवाळी भेटीमुळे नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी उपनगराध्यक्ष म हादेव धोत्रे, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह पंढरपूर नगर परिषदेचे सर्व नगरसेवक ही उप-स्थित होते.



ओंकार शुगर कॉर्पोरेशनतर्फे दिपावली निमित्त ऊस पुरवठादार शेतकरी यांना मोफत साखर वाटप



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : ओंकार शुगर कार्पोरेशन प्रा. लि. युनिट नं. १४ चंद्रभागानगर – भाळवणी, ता.पंढरपूर जि.सोलापूर. ओंकार उद्योग समूहाचे चेअरमन तसेच अशोक नागरी सहकारी बँकेचे संस्थापक माननीय श्री.बाबुराव दादासाहेब बोत्रे-पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व संचालक मा.श्री. प्रशांत (मालक) बोत्रे पाटील साहेब यांच्या संकल्पनेतून आज सोमवार दिनांक ०२ नोव्हेंबर २०२६ रोजी दिपावली निम्मित ऊस पुरवठादार शेतकरी यांना मोफत साखर वाटप कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. रविंद्र साळुंखे साहेब यांचे शुभहस्ते करण्यात आले

यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर साहेब यांनी ओंकार उदयोग समूहाचे सर्वेसर्वा मा. श्री. बाबुराव बोत्रे पाटील साहेब यांनी एन दुष्काळ परिस्थितीत ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना मोफत साखर वाटपाचे धोरण निश्चित केल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

दिपावलीचा सण आनंदाने साजरा करण्यास व दिवाळी गोड होण्यास आर्थिक मदत होणार असल्याचे सांगितले.

यावेळी सर्व खातेप्रमुख यांच्याही शुभहस्ते मोफत साखर देऊन शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी चिफ इंजिनिअर श्री. अजिनाथ बनकर, चिफ केमिस्ट श्री. मोहन पवार, केन मॅनेजर श्री. दादासाहेब देशमुख, डिस्टीलरी मॅनेजर श्री. रामचंद्र शेवाळे, चिफ अकाउंटंट श्री. विजय तंडे, कार्यालयीन अधीक्षक श्री. चांगदेव चव्हाण, काम गार अधिकारी श्री. युवराज भंडारे, सर्व अधिकारी, विभागप्रमुख, कामगार व ऊस पुरवठादार शेतकरी बंधू मोठया संख्येने उपस्थित होते.

लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम; महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत कोल्हापूर अभ्यास दौरा यशस्वी



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : मौजे लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांच्या वती-ने ग्रामपंचायतीतील सर्व महिला कर्मचारी तसेच विविध शासकीय विभागांतील महिला कर्मचाऱ्यांसाठी कोल्हापूर येथे मोफत अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा अभ्यास दौरा उत्साह-पूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

महिला कर्मचाऱ्यांना विविध क्षेत्रांतील विकासकामे, प्रशासकीय कार्यपद्धती आणि सामाजिक उपक्रमांची माहिती मिळावी, तसेच त्यांच्या ज्ञानात व अनुभवात भर पडावी, हा या दौऱ्यामागील मुख्य उद्देश होता.

महिला कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणारा आणि त्यांच्या शैक्षणिक व व्यावहारिक ज्ञानात भर घा-लणारा हा उपक्रम लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात आला. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाची कारवाई

सोनके येथे चार जणांच्या घरांची झडती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यात अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी सहकार विभागाने महत्त्वपूर्ण कारवाई सुरु केली आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मुकुंद पवार यांच्या म ार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था सुनील तेलंगरे यांच्या नेतृत्वाखाली सोनके येथे चार जणांच्या घरांची झडती घेण्यात आली.

महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४ च्या कलम १६ अन्वये कारवाई



मौजे सोनके, (ता. पंढरपूर), येथे महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४ च्या कलम १६ अन्वये ही कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान सागर जनार्दन कोळेकर, सचिन मारुती पाटील (खरात), रणजित आजिनाथ कोळेकर आणि महेश गलांडे या सर्व सोनके येथील रहिवाशांच्या घरांची झडती घेण्यात आली. या कारवाईसाठी

संशयास्पद कागदपत्रांची तपासणी सुरू

पथकप्रमुख पी. बी. सावंत, एस. एस. सांगोलकर, एस. एस. जाधव आणि ए. जी. जाधव यांच्या पथकाने सहभाग घेतला. घरझडतीदरम्यान आढळून आलेल्या संशयास्पद कागदपत्रांची चौकशी व तपासणी सुरू आहे. या तप-ासणीतून उपलब्ध होणारे सबळ पुरावे आणि कागदपत्रांच्या आधारे पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था सुनील तेलंगरे यांनी दिली. रपूर तालुक्यातील नागरिकांनी अवैध सावकारीसंदर्भात काही तक्रारी किंवा माहिती असल्यास तातडीने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही सहाय्यक निबंधक सु-नील तेलंगरे यांनी केले आहे.

३७ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनंतर धोंडीराम बाबर सर सेवानिवृत्त; शिवाजी तरुण मंडळाच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सजय चव्हाण/सैनिक टाकळी : संभाजीनगर : शिक्षण क्षेत्रात तब्बल ३७ वर्षे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे शिक्षक तथा मुख्याध्यापक धोंडीराम रघुनाथ बाबर सर हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यांनी आपल्या सेवाकाळातील शेवटची सेवा राजापूरवाडी येथे बजावली.

त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक योगदानाबद्दल शिवाजी तरुण मंडळ, संभाजीनगर यांच्या वतीने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

बाबर सर यांनी ३७ वर्षांच्या सेवाकाळात विद्यार्थ्यांना ज्ञानासोबतच संस्कार, शिस्त आणि जीवनमूल्यांची शिकवण दिली. त्यांच्या म ार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी घडले असून, त्यांच्या शैक्षणिक कार्याचा ठसा कायम स्मरणात राहील.

या सत्कारप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य उपस्थित होते. यावेळी रामदास पाटील, महादेव पाटील, शशिकांत कदम, अमर पाटील, संजय चव्हाण, संजय कोळी, दादासो सावंत, एकनाथ पाटील, धन-ाजी पाटील, रंजीत पाटील, बंडू गायकवाड, काकासो पाटील, सोपान पाटील यांच्यासह मंडळाचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी बाबर सर यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचे कौतुक करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि आनंदाच्या शुभेच्छा दिल्या.

ज्ञानदानातून समाज घडविणाऱ्या शिक्षकांचा सन्म ान म्हणजेच खऱ्या अर्थाने गुरुवंदना!



दुधनीचा मुख्य रस्ता धूळ व कचरामुक्त करण्यासाठी व्यापक श्रमदान; स्वच्छतेचा संदेश देत महास्वामीजींनी उपक्रमाचे केले कौतुक!

जन्मभूमी फाउंडेशनच्या 'एक रविवार गावाच्या नावे' स्वच्छता मोहिमेत पूज्य डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजींचा सहभाग

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दुधनी : प्रतिनिधी – निंगप्पा निंबाळ : दुधनी शहरात स्वच्छतेची जनजागृती व्ह-ावी आणि शहराचे आरोग्य व सौंदर्य टिकून राहावे, या उद्देशाने जन्मभूमी फाउंडेशनच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या 'एक रविवार गावाच्या नावे' या विशेष स्वच्छता मोहिमेत पूज्य श्री. म. नि. प्र. डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी (दुधनी) यांनी प्रत्यक्ष सहभागी होऊन श्रमदान केले. त्यांच्या उपस्थितीने म ोहिमेला विशेष प्रेरणा मिळाली.

रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित या मोहिमेत दुधनी शहरातील मुख्य रस्ता धूळमुक्त आणि कचरामुक्त करण्यासाठी व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले. रस्त्याच्या कडेला सा-चलेली माती, धूळ, कचरा तसेच परिसरातील अस्वच्छता दूर करण्यासाठी फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांसह स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे श्रमदान केले.



यावेळी मार्गदर्शन करताना पूज्य डॉ. शांतलिंगेश्वर महास्वाम ीजी यांनी जन्मभूमी फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले. गावाची स्वच्छता आणि परिसराचे आरोग्य जपणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. अशा सामूहिक श्रमदानाच्या उपक्रम ांमुळे समाजात स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होते आणि गावाच्या विकासाला हातभार लागतो, असे विचार त्यांनी व्यक्त केले.

स्वच्छ दुधनी, सुंदर दुधन-ीचा संकल्प!

'एक रविवार गावाच्या नावे' हा उपक्रम केवळ स्वच्छता मोहीम नसून नागरिकांमध्ये सामाजिक बांधिलकी, एकजूट आणि गावाप्रती आपलेपणाची भावना निर्माण करणारा प्रेरणादायी उपक्रम ठरत आहे. जन्मभूमी फाउंडेशनच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक ग्राम स्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून श्रमदानातून स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला.

या उपक्रमाचे दुधनी शहरा-तील नागरिकांकडून सर्वत्र स्व-ागत व कौतुक होत असून, स्वच्छतेची ही चळवळ सातत्याने सुरू राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

प्रवीण पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस (श. प) च्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

नवनिर्वाचित आमदार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांच्या हस्ते नियुक्ती; राजकीय वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

धाराशिव, प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी प्रवीण पाटील सर एकोंडी लोहारा यांची निवड करण्यात आली आहे. म राठवाडा पदवीधर मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मा. डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीबद्दल सन्मानित करण्यात आले.



प्रवीण पाटील सर यांच्या निवडीमुळे पक्षसंघटनेला धाराशिव जिल्ह्यात अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पक्षाचे विचार आणि ध्येयधोरणे जनसाम ान्यांपर्यंत पोहोचविण्यासह संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल.

या निवडीबद्दल प्रवीण पाटील सर यांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.